# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः07.09.2025** **वारःरवीवार**

- राज्यात सर्वत्र अत्यंत भावपूर्ण वातावरणात लाडक्या गणरायाला निरोप.

- भारत आणि अमेरिका यांच्यात सकारात्मक, दूरगामी, सर्वसमावेशक आणि धोरणात्मक भागीदारी असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन.

- ६० वर्षांच्या सेवेनंतर मिग २१ या लढाऊ विमानांना निरोप.

आणि

- आशिया करंडक हॉकी स्पर्धेत चीनचा पराभव करत भारत अंतिम फेरीत दाखल.

**<u>विसर्जन</u>**

**<u>Intro-प्रशांत</u>**

गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या ! अशा जयघोषात पुण्यासह संपूर्ण राज्यभरात लाडक्या गणरायाला काल भावपूर्ण निरोप देण्यात आला. अनंत चतुर्दशीच्या निमित्ताने, गणेश मंडळांनी उत्साहात मिरवणुका काढल्या. घरगुती गणेश मूर्तींचंही विधिवत विसर्जन करण्यात आलं. ढोल-ताशांच्या गजरात आणि गुलालाच्या उधळणीत बाप्पाला निरोप देताना, भाविकांमध्ये पुढील वर्षी पुन्हा भेटण्याची ओढ दिसून आली. राज्य शासनाने गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे, त्या उत्सवाचा जल्लोष मुंबईत गिरगाव चौपाटीवर उच्चांक गाठताना दिसून आला. या सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः उपस्थित राहून गणरायाला निरोप दिला. राज्यातील गणेश विसर्जन मिरवणूकीबद्दल अधिक वृत्तांत ऐकूयात आमच्या प्रतिनिधीकडून. . . . . . . .

स्क्रिप्ट : पुण्यात मानाच्या पाच गणेश मूर्तींचं विसर्जन काल संध्याकाळ पर्यंत झालं. तर ठिकठिकाणी कृत्रिम हौदामध्ये पर्यावरणपूरकतेचा संदेश देत घरगुती गणपतींचं विसर्जन करण्यात आलं. सार्वजनिक मंडळांचे गणेश

विसर्जन ढोल ताशा, लेझीम या पारंपरिक वाद्यांसह तर काही सार्वजनिक गणेश मंडळांनी डीजेच्या दणदणाटात गणेश विसर्जन केलं. मानाचा पहिला कसबा गणपती, मानाचा दुसरा तांबडी जोगेश्वरी मंडळ , मानाचा तिसरा गुरुजी तालीम मंडळाचा गणपती , मानाचा चौथा तुळशीबागेचा गणपती आणि मानाच्या पाचव्या केसरीवाड्याच्या गणपतीचं विसर्जन नियोजित वेळेत झालं. मिरवणूक पाहण्यासाठी पुण्यात राज्यभरातून भाविक दाखल झाले आहेत. केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील आणि विधान परिषदेच्या उप-सभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी पहिला मानाच्या कसबा गणपतीची पालखी खांद्यावर घेऊन मिरवणुकीत भाग घेतला. संपूर्ण वातावरण उत्साहाने भारलेलं होतं आणि हजारो लोक या भव्यदिव्य कार्यक्रमाचे साक्षीदार होण्यासाठी जमले होते. राज्यात ठिकठिकाणी पर्यावरणपूरक गणेश विसर्जन करण्यावर विशेष भर देण्यात आला. अनेक ठिकाणी मूर्तीदानाच्या उपक्रमाला नागरिकांना मोठा प्रतिसाद दिला. मुंबईत गणेश विसर्जनासाठी ७० नैसर्गिक स्थळं आणि २९० कृत्रिम तलाव तयार करण्यात आले होते. लालबागचा राजा , गिरगावचा राजा यांच्या जल्लोषपूर्ण मिरवणुका पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. नाशिक , कोल्हापूर , रायगड, अहिल्यानगर ,वाशिम,छत्रपती संभाजीनगर,नांदेड , बुलडाणा आदि जिल्ह्यातदेखील मोठ्या उत्साहात बाप्पाला निरोप देण्यात आला. परभणीमध्ये डॉल्बीमुक्त विसर्जन मिरवणूक काढण्याचं नियोजन करण्यात आलं होतं. धाराशिवमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकांमध्ये देशभक्तीपर देखाव्यावर भर देण्यात आला होता. नागपूर महापालिकेतर्फे शहरातील प्रमुख तलावांचे परिसर तसंच अन्य २१६ ठिकाणी एकंदर ४१९ कृत्रिम विसर्जन तलावाची व्यवस्था करण्यात आली होती. नंदुरबार जिल्ह्याच्या गणेश विसर्जन मिरवणुकीचे आगळे वेगळे वैशिष्ट असलेल्या दादा गणपती आण बाबा गणपती यांचा हरिहर भेटेचा सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. पिंपरी-चिंचवडसह इतर ठिकाणी राज्य शासनाच्या निर्देशानुसार गणेशोत्सव काळात शासकीय योजना, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि सांस्कृतिक कार्याची माहिती देणारे फलक चौकाचौकात लावण्यात आले होते. रत्नागिरीतल्या गणपतीपुळे तीर्थक्षेत्री स्वयंभू गणेशमूर्तीभोवती फळांची विशेष आरास करण्यात आली होती. विसर्जनाच्या दिवशी 'म्हामने' अर्थात महाप्रसादाची आगळीवेगळी प्रथा पाळण्यात आली. दिल्लीतील महाराष्ट्र सदनात कोल्हापूरच्या सिद्धेश्वर झांज पथकाच्या ढोल-ताशांच्या निनादात गणरायाला निरोप देण्यात आला. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते काल गणेशाची आरती घेण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'वर्षा' निवासस्थानी लाडक्या बाप्पाचे कुटुंबियांसोबत, पर्यावरणपूरक पद्धतीनं विसर्जन केलं. बाप्पा आपल्या प्रत्येकाच्या मना-मनात सदैव विराजमान असतो आणि त्याचे आशिर्वादही कायम आपल्यासोबत असतात अशा भावना फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केल्या. राज्यात सर्वत्र पोलिसांनी संपूर्ण प्रक्रियेदरम्यान व्यवस्थापन आणि सुरक्षेसाठी व्यवस्था केली असल्यानं सर्व मिरवणुका निर्विघ्न पार पडत आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी आमच्या ठिकठिणच्या वार्ताहरांसह. विजयालक्ष्मी साळवी , पुणे.

दरम्यान पुण्यात आणि इतरत्र काही ठिकाणी अजूनही गणेश विसर्जन मिरवणुका सुरू आहेत.

**<u>ईदजुलूस</u>**

नाशिक शहरात प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांचा १५०० वा जन्मोत्सव अर्थात ईद-ए-मिलाद मोठ्या उत्साहात साजरी झाली. परंपरेनुसार चौकमंडई येथून मुख्य 'जुलूस-ए-मुहम्मदी' ची मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकीचे नेतृत्व शहर-ए-खतीब हाफिज हिसामुद्दीन अशरफी यांनी केले. रात्री या मिरवणूकीची सांगता झाली. मालेगाव येथेही अत्यंत शांततेत आणि उत्साहात मिरवणूक पार पडली. राज्यात इतरत्रही अशा स्वरूपाच्या जुलूसचे आयोजन करण्यात आले होते.

**<u>मोदीट्रंप</u>**

भारत आणि अमेरिका यांच्यात एक अत्यंत सकारात्मक आणि दूरगामी, सर्वसमावेशक आणि जागतिक धोरणात्मक भागीदारी आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी उभय देशांमधल्या संबंधांबद्दल केलेल्या विधानावर त्यांनी काल समाज माध्यमावर प्रतिक्रिया दिली आहे. ट्रम्प यांनी अतिशय संवेदनशील आणि सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल मोदी यांनी त्यांचं कौतुक केलं.

भारत आणि अमेरिकेचे संबंध विशेष असून सध्याच्या तणावानंतरही आपली मोदी यांच्याबरोबर असलेली मैत्री कायम राहील. ते अत्यंत चांगले पंतप्रधान आहेत. ते महान आहेत, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. भारत आणि अमेरिकेचे संबंध अत्यंत खास असल्याने चिंता करण्याची गरज नाही असंही ट्रंप यांनी काल सांगितलं. त्यावर, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या भावना आणि त्यांनी दोन्ही देशांच्या संबंधांची घेतलेली सकारात्मक नोंद याचा आपण मनापासून आदर करतो असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे.

**<u>तेलसीतारामन</u>**

भारत यापुढेही रशियाकडून तेल खरेदी करत राहील आणि कोणत्याही निर्णयामागे राष्ट्रहित सर्वोपरी असेल असं ठाम प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलं आहे. रशियाकडून तेलाची खरेदी असो किंवा अन्य मुद्दा असो, योग्य दर आणि वाहतुकीनुसार आपल्या आवश्यकतांना प्राधान्य दिलं जाईल, असं त्यांनी काल एका मुलाखतीत सांगितलं. नवीन जीएसटी प्रणालीमुळे वस्तूंचा खप वाढेल मात्र त्यामुळे भांडवली खर्चावर काहीही परिणाम होणार नाही, बहुतांश सर्व म्हणजे ९९ टक्के वस्तू आणि सेवा आता शून्य किंवा पाच किंवा १८ टक्के स्लॅब अंतर्गत येतात, असं त्यांनी सांगितलं. अमेरिकेनं ५० टक्के आयातशुल्क केल्यामुळे फटका बसलेल्या निर्यातदारांसाठी काही उपाययोजना करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं त्या म्हणाल्या.

**<u>जीएसटी</u>**

केंद्रीय कृषी आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी नवीन जीएसटी दरांचा कृषी क्षेत्राला मोठा लाभ होईल असं म्हटलं आहे. भोपाळ इथं काल पत्रकार परिषदेत बोलताना चौहान यांनी या बदलांचा विशेषतः लहान

आणि मध्यम शेतकऱ्यांना फायदा होईल असा विश्वास व्यक्त केला. शेतीचा खर्च कमी होईल आणि शेतकऱ्यांचा नफा वाढेल, असंही ते म्हणाले.

**वैष्णव**

जीएसटी सुधारणेमुळे देशाच्या जीडीपीत २० लाख कोटी रुपयांची भर पडणार असून यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल, असा विश्वास केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना व्यक्त केला. हा मध्यमवर्गासाठी मोठा दिलासा असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

**मिगनिरोप**

भारतीय वायू दलातील  १९६० च्या दशकातील जगातील सर्वोत्तम लढाऊ विमानांपैकी एक असलेल्या  मिग २१ विमानांना ६० वर्षांच्या सेवेनंतर निरोप दिला जाणार आहे. येत्या २६ सप्टेंबरला चंदीगडच्या आकाशात मिग २१ चं शेवटचे उड्डाण होणार आहे. हा ऐतिहासिक क्षण संस्मरणीय बनवण्यासाठी भारतीय वायु दलाने पूर्ण तयारी केली आहे. मिग विमानाचं सारथ्य केलेले सर्व निवृत्त लढाऊ वैमानिक याप्रसंगी उपस्थित राहणार आहेत.

**अतिवृष्टी**

सोलापूर जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टी आणि भीमा नदीला आलेल्या पुरामुळं जिल्ह्यातील शेतीचं अंदाजे साठ कोटी रुपयांचं नुकसान झालं आहे. याचा सर्वाधिक फटका उत्तर आणि दक्षिण सोलापूर, बार्शी आणि अक्कलकोट तालुक्याला बसला आहे. त्यासाठी नुकसानभरपाई मागणीचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडून शासनाकडं पाठवण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनानं दिली आहे.

**टेटे-पुल**

अठ्ठाविसाव्या आशियाई टेबल टेनिस संघ अजिंक्यपद स्पर्धेचं आयोजन ११ ते १५ ऑक्टोबरदरम्यान ओडिशात भुवनेश्वर इथं होणार आहे. टेबल टेनिस फेडरेशन ऑफ इंडियानं काल ही घोषणा केली. यात पुरुष आणि महिला संघांच्या स्पर्धा होतील. ही स्पर्धा पुढील वर्षीच्या आयटीटीएफ जागतिक संघ अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्रता फेरी ठरणार असून, त्यामध्ये प्रत्येक श्रेणीतील शीर्ष १३ संघांना स्थान मिळेल.

**<u>हॉकी</u>**

बिहारमधील राजगीर आंतरराष्ट्रीय मैदानावर सुपर फोर फेरीतील शेवटच्या सामन्यात भारतानं काल चीनला ७-० गोल्सनं हरवून आशिया करंडक हॉकी स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. आता विजेतेपदासाठी भारत आणि कोरिया यांच्यात आज संध्याकाळी याच मैदानावर सामना होईल. भारतानं चीन संघाविरुद्ध सुरुवातीपासूनच उत्कृष्ट समन्वय आणि आक्रमक खेळ करत वर्चस्व राखलं. भारतीय संघ या स्पर्धेत आतापर्यंत अपराजित राहिला आहे.

**<u>हवामान</u>**

मध्य महाराष्ट्राचा घाट प्रदेश आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि विजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भ आणि उत्तर कोकणातही तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.